विभागातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व
गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना २ दिवसांची
रजा मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यालयीन परिपत्रक क्रमांक रजादे २०१८/प्र.क्र.३००/प्रशासन-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८/१२/२०१८

## कार्यालयीन परिपत्रक

सार्वजनिक बांधकाम विभाग (खुद) मध्ये सद्य:स्थितीत केवळ गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या शिफारशीनुसार किमान २ दिवसांची अर्जित/परिवर्तीत रजा/अर्धपगारी रजा मंजूर करण्यात येते. तथापि, गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील कर्मचाऱ्यांना किमान ३ दिवसांची अर्जित रजा/परिवर्तित रजा/अर्धपगारी रजा अनिवार्य करण्यात आली आहे.

२. सर्वसाधारणपणे रजा म्हणजे सक्षम प्राधिकाऱ्याने स्वेच्छा निर्णयानुसार कामावर अनुपस्थित राहण्यास दिलेली परवानगी. तथापि, अधिकारी/कर्मचाऱ्यांना हक्क म्हणून रजा मागता येत नाही. रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, लोकसेवेची निकड तसेच कार्यालयीन कामकाजाची निकड पाहून एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची रजा नाकारु वा रद्द करु शकतो. कर्मचाऱ्यांच्या रजेची वारंवारता विचारात घेऊन त्या कर्मचाऱ्याच्या रजेसंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याने शिफारस करणे आवश्यक ठरते. सद्य:स्थितीत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना ८ नैमितिक रजा अनुज्ञेय आहेत. नैमितिक रजा हया किरकोळ कारणास्तव अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून घेतल्या जातात. तथापि, सध्याच्या धकाधकीच्या तसेच तणावपूर्ण जीवनात बऱ्याच वेळा वैयक्तिक कारणास्तव वा कौटुंबिक कारणास्तव अनुज्ञेय नैमितिक रजा पुरेशा पडत नाहीत.

३. वरील वस्तुस्थितीचा साकल्याने विचार करुन, आता दिनांक १ जानेवारी २०१९ पासून विभागातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार किमान २ दिवसांची अर्जित रजा/ अर्धपगारी रजा/परिवर्तित रजा अनुज्ञेय करण्यात येत

Scanned by CamScanner

अहे. मात्र, या सवलतीचा गैरवापर होऊ लागल्यास ही सवलत रद्द करण्यात येईल, हे त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

पु.जि.तरडे

(पू.जि.तरडे)
कार्यासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग

प्रत,

प्रधान सचिव (सा.बां.) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

सचिव (रस्ते/बांधकामे) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

सर्व सह सचिव/उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

सर्व अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

कार्यासन अधिकारी, प्रशासन-२, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

सर्व गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड कर्मचारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

हजेरी लिपिक, प्रशासन ३, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

निवड नस्ती (प्रशासन-३).

Scanned by CamScanner